सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## महत्वाचे...

### श्रीराम जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळातर्फे उद्या हिंदू संमेलन

**सोलापूर, दि. १८ मार्च-**

श्रीराम जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळातर्फे शुक्रवार २० मार्च रोजी हिंदू संमेलनाचे आयोजन केल्याची माहिती महामंडळाच्या उत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांनी पत्रकार परिषदेत दिली. श्रीराम नवमीच्या पावन पर्वानिमित्त महामंडळाच्यावतीने संस्थापक अध्यक्ष सुधीर बहिरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली ५१ प्रभू श्रीराम मूर्ती वाटप आणि विराट हिंदू संमेलनाचे आयोजन केले आहे. हा कार्यक्रम शुक्रवार २० मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता, चिल्ड्रन पार्क, वालचंद कॉलेज जवळ, कर्णिक नगर येथे होणार आहे. या संमेलनास तेलंगणाचे आमदार राजासिंह ठाकूर, आमदार गोपीचंद पडळकर, समस्त हिंदू आघाडीचे अध्यक्ष मिलिंदभाऊ एकबोटे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यावेळी राम रथाचे आगमन व पूजन सोहळाही होणार आहे. या सोहळ्यास सोलापूर शहर व परिसरातील सर्व रामभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. कोठे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस आनंद मुसळे, अमित राऊत, शिवराज गायकवाड, सुधीर बहिरवाडे, देविदास मिटकरी, संदीप जाधव उपस्थित होते.

### सार्वजनिक सुट्ट्यांमध्येही नोंदणी कार्यालये सुरू ठेवण्याचे आदेश

**सोलापूर, दि. १८ मार्च-**

नववर्षाच्या पार्श्वभूमीवर मालमत्ता व्यवहारांमध्ये वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन २६, २८, २९ आणि ३१ मार्च २०२६ या चार सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी राज्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालये कार्यरत राहणार असल्याची माहिती मुद्रांक जिल्हाधिकारी श्रीराम कोळी यांनी दिली. ज्या कार्यालयांची साप्ताहिक सुट्टी शनिवार-रविवार व्यतिरिक्त इतर दिवशी असते, त्या कार्यालयांनी त्यांच्या दोन साप्ताहिक सुट्ट्यांपैकी एक दिवस कामकाजासाठी राखून ठेवण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. संबंधित कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी आणि मुद्रांक शुल्क, अभिनिर्णय आदी प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालये देखील या दिवसांमध्ये सुरू राहतील.

# सर्वसामान्य शेतकरी दीपक वैद्य जिल्हा परिषदेचे नवे अध्यक्ष

- अध्यक्ष, उपाध्यक्ष बिनविरोध; 'सव्वा-सव्वा वर्ष' ठरला फॉर्म्युला
- जिल्हा परिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच भाजपाला मोठे बहुमत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ मार्च-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी बार्शीचे दिपक वैद्य तर उपाध्यक्षपदी उत्तर सोलापूर तालुक्याचे इंद्रजीत पवार यांची बिनविरोध निवड झाली आहे. अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी 'सव्वा-सव्वा वर्ष' असा फॉर्म्युला ठरला आहे. जिल्हा परिषद स्थापनेच्या इतिहासात पहिल्यांदाच सोलापूर जिल्हा परिषदेवर भाजपाचे बहुमत आणि अध्यक्ष निवड झाली आहे. यंदा सोलापूर शहर व जिल्ह्यात झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने भरघोस यश मिळवले.



सोलापूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी बार्शीचे दीपक वैद्य आणि उपाध्यक्षपदी मार्डीचे इंद्रजीत पवार यांची निवड करण्यात आली. गेल्या अनेक दिवसांपासून जिल्हा परिषदेचा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष कोण होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार बंद लिफाफामध्ये अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदाची नावे दाखल झाल्यानंतर अर्ज सादर करावयाच्या दिवशी बुधवारी सकाळी पावणे बारा वाजता भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण आणि चेतन सिंह केदार यांच्यासह गटनेत्या रश्मी बागल, नेताजी खंडागळे, बालाजी नरोटे आदींनी पुढाकार घेत अध्यक्षपदासाठी दीपक वैद्य तर उपाध्यक्ष पदासाठी इंद्रजीत पवार या दोघांचे अर्ज दाखल केले. यावेळी व्यासपीठावर साहाय्यक निवडणूक निर्णयाधिकारी संतोष देशमुख, उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कसेकर, तहसीलदार पूनम दंडीले यांनी अर्ज स्वीकारले. अध्यक्ष अर्जासाठी बालाजी नरोटे सूचक तर नेताजी खंडागळे अनुमोदक राहिले तर उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांच्या अर्जासाठी पृथ्वीराज माने हे सूचक तर चेतनसिंह केदार हे अनुमोदक राहिले. दुपारी बारा वाजता अर्ज दाखल केल्यानंतर भाजपचे नेते काहीकाळ बालाजी सरोवर येथे चहापानासाठी दाखल झाले.

दरम्यान, सभेच्या निर्धारित वेळेत निवडणूक निर्णय अधिकारी तथा पिठासीन अधिकारी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद हे यशवंतराव सभागृहात दाखल झाले. त्यानंतर सभेच्या वेळेनुसार नूतन सदस्य दुपारी २ वाजण्याच्या सुमारास सभागृहात सदस्य येण्यास सुरुवात झाली. आलेल्या सर्व सदस्यांच्या सह्या प्रशासनाने मस्टरवर घेतल्या. त्यानंतर भाजपाचे प्रमुख नेते आणि अध्यक्ष उपाध्यक्ष पदाचे उमेदवार सभागृहात दाखल झाले. निर्धारित वेळेनुसार सभेची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने झाली. त्यानंतर निवडणुकीचे कामकाज उप जिल्हाधिकारी संतोष देशमुख यांनी सुरू केले. या कामकाजात पीठासीनाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी अध्यक्ष निवडीचे कामकाज सुरू केले. यावेळी अध्यक्षपदासाठी दीपक वैद्य यांचा एकमेव तर उपाध्यक्ष पदासाठी इंद्रजीत पवार यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने ही निवडणूक बिनविरोध जाहीर होत असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा पिठासीन अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जाहीर केले. यावेळी सभागृहात टाळ्यांचा गजर झाला. तदनंतर पिठासीन अधिकारी कुमार आशीर्वाद तसेच सीईओ कुलदीप जंगम यांनी नूतन अध्यक्ष दीपक वैद्य आणि उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.



# 'किस्सा खुर्चीचा' झेडपीत गाजला

- आ.कल्याणशेट्टींच्या एका कृतीने जिंकले सर्वांचे मन!
- सत्तास्थापनेच्या सभागृहात साधेपणा, संवेदनशीलतेचा अनोखा क्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ मार्च-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीचा सोहळा पार पडताना केवळ सत्तास्थापनेपुरता मर्यादित न राहता एक वेगळाच "खुर्चीचा किस्सा" चर्चेचा विषय ठरला.

पालकमंत्री जयकुमार गोरे आणि सचिन कल्याणशेट्टी यशवंतराव सभागृहात दाखल होताच सर्वजण बसले; मात्र नूतन उपाध्यक्ष इंद्रजीत पवार हे मागे उभे असल्याचे कल्याणशेट्टी यांच्या लक्षात आले. त्यांनी तत्काळ स्वतः उठून आपली खुर्ची उपाध्यक्षांना दिली. त्यानंतर राम सातपुते यांनीही पुढाकार घेत स्वतःची खुर्ची देत साध्या खुर्चीवर स्थान घेतले. आ. कल्याणशेट्टी यांची पुन्हा तत्परता दर्शवत युवा नेते मनीष देशमुख उभे असल्याचे आ. कल्याणशेट्टींच्या लक्षात येताच त्यांनी तातडीने त्यांच्यासाठी खुर्चीची व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या. जिल्हा सरचिटणीस विकास वाघमारे यांनी कर्मचाऱ्यांकडून खुर्ची मागवून



देशमुख यांना बसण्याची सोय केली. मात्र माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार यांच्यासाठी खुर्ची उपलब्ध नसल्याचे पाहून त्यांना खंत वाटल्याचेही दिसून आले.

या संपूर्ण प्रसंगाने सत्तेच्या गदारोळातही संवेदनशीलता आणि साधेपणाचे दर्शन घडवत "खुर्चीचा किस्सा" सोलापूर झेडपीच्या सभागृहात विशेष ठरला. सभागृहात सुरुवातीला माजी आमदार राजन पाटील आणि दीपक साळुंखे शेवटच्या खुर्चीवर बसले होते. "पुन्हा कोपऱ्यात जाऊ नये म्हणून खुर्ची सरकत सरकत बाहेर निघू," अशी हलकीफुलकी टिप्पणी करत राजन पाटील यांनी वातावरणात हशा पिकवला. दरम्यान, याप्रसंगी आ.सचिन कल्याणशेट्टी यांनी दाखवलेल्या संवेदनशीलतेने सभागृहातील सर्वांचीच मने जिंकली. जिल्हा परिषदेत प्रथमच पूर्ण बहुमतासह भारतीय जनता पक्ष सत्तेत आला असून पक्षाचा पहिला अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडला गेला.

# पूर्व विभाग श्री राम मंदिराच्या अध्यक्षपदी श्रीनिवास सामलेटी

- प्रसिध्दी प्रमुखपदी श्रीनिवास बिनगुंडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

दाजी पेठेतील पूर्वविभाग श्री राम मंदिराच्या अध्यक्षपदी श्रीनिवास भूपती सामलेटी तर प्रसिध्दी प्रमुखपदी श्रीनिवास अंबाजी बिनगुंडी यांची एकमताने निवड करण्यात आली, तसेच विश्वस्तपदी कोंडय्या शिंगराय्या मेरगु, भूपती सिद्रामप्पा सामलेटी, मुरलीधर नरसय्या श्रीराम, दयानंद नारायण कोंडाबत्तीनी, गोवर्धन नागनाथ चाटला यांची निवड करण्यात आली.

अन्य पदाधिकारी याप्रमाणे उपाध्यक्ष-दत्ता किसन श्रीराम, सेक्रेटरी-महेश राजू कोडम, सहसेक्रेटरी शिवकुमार दयानंद कोंडाबत्तीनी, खजिनदार-राजीव मार्कंडेय आडम, सहप्रसिध्दी प्रमुख हरिप्रसाद रामचंद्र जन्नू, कार्यकारिणी सदस्य कृष्णमुर्ती मल्लय्या चिंताकिदी, सल्लागार- रामदास दत्तात्रय मंता, संतोष व्यंकटेश म्हंता, डॉ. भास्कर सत्तय्या द्यावनपल्ली, शिवकुमार कोंडय्या मेरगु, महेश प्रकाश कोटा, नरेश अंबादास श्रीराम, प्रभाकर यल्लप्पा येमूल, किरण श्रीनिवास



श्रीनिवास सामलेटी



श्रीनिवास बिनगुंडी

गाजूल. सूर्योदयाच्या वेळी सूर्यदेवासह प्रभू श्रीराम, सीतामाई, लक्ष्मण यांच्या मूर्ती आणि शिखराचे एकाचवेळी दर्शन घडत असल्याने या मंदिराची ख्याती सर्वदूर आहे. दरवर्षी श्री राम नवमीच्या दिवशी येथील जन्मोत्सवम् व कल्याणोत्सवम् कार्यक्रम पाहण्यासाठी भक्तगणांची मोठी गर्दी होत असते.

मंदिराच्या वतीने श्री राम जन्मोत्सव यांसह वर्षभरात विविध धार्मिक, सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते, असे मंदिर समितीकडून सांगण्यात आले.

पंतप्रधान किसान योजनेंतर्गत

# जिल्ह्यातील पावणे पाच कोटी शेतकऱ्यांना मिळाले ९७ कोटी

### ई-केवायसीमुळे ५ हजार ४८२ जणांचे पैसे पेंडिंग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**



पीएम किसान योजनेतून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आसाममधून २२व्या हप्त्याचे वितरण केले असून, पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्येकी २ हजार रुपये जमा झाले. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील ४ लाख ८६ हजार ९७७ शेतकऱ्यांना ९७ कोटी ३९ लाख ५४ हजार रूपये जमा झाले आहेत. दरम्यान, ई-केवायसीमुळे ५ हजार ४८२ जणांचे पैसे पेंडिंग पडले असल्याची माहिती कृषी विभागाकडून मिळाली.

महाराष्ट्र राज्य सरकारच्या 'नमो शेतकरी योजने'चा ८ वा हप्ता देखील लवकरच वितरित होणार असून, त्यासाठी १,७७४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. दरम्यान, ज्या शेतकऱ्यांच्या खात्यात अद्याप पैसे आले नाहीत, त्यांनी PM² Kisan पोर्टलवर जाऊन त्यांची ईकेवायसी स्टेटस, आधार लिंक असलेले बँक खाते आणि जमिनीची नोंद तपासावी. राज्य आणि केंद्राकडून मिळालेल्या या मदतीमुळे शेतकऱ्यांना त्यांची शेतीविषयक काही कामे करता येतात. पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या या २२ व्या हप्त्याचं वितरण आसाम राज्याची राजधानी गुवाहाटी येथून करण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ही रक्कम देशभरातील ९ कोटी ३२ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम वर्ग केली आहे. २२ व्या हप्त्यासाठी केंद्र सरकारच्या कृषी आणि ग्रामीण विकास मंत्रालयाकडून १८ हजार ६४० कोटी रुपये वर्ग केले.

दरम्यान, पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या वेबसाईटनुसार १ जानेवारी २०२६ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील ९० लाख ७३ हजार ६७८ शेतकरी यासाठी पात्र झाल्याची माहिती मिळाली.



# महाप्रसाद वाटपाने बाळीवेस येथील श्री मल्लिकार्जुन यात्रेस सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

बाळीवेस येथील श्रीमल्लिकार्जुन मंदिरामध्ये बुधवारी गुढीपाडव्यानिमित्त यात्रा हजारो भक्त गणाच्या उपस्थितीत उत्साहात पार पडली. यावेळी महाप्रसादाकरिता माडण्यात आलेल्या हंड्याचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर महाप्रसाद देण्यात आला.

रात्री उशिरापर्यंत भक्तगणाला पाच ते सहा हजार जणांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सकाळी सात वाजता भजनास सुरुवात करण्यात आली. बुधवारी सकाळी सात वाजता सुरू झालेली हे भजन गुरुवारी सकाळी सात वाजता समाप्त झाले. या भजनामध्ये आठ मंडळ सहभागी झाले होते. श्री मल्लिकार्जुन मंदिरांमधील हा यात्रा महोत्सव सुरळीतरित्या पार पाडण्यासाठी मंदिर समितीचे अध्यक्ष बसवराज स्वामी, उपाध्यक्ष शिवया वस्त्रद, सेक्रेटरी बाळासाहेब दर्गो पाटील, खजिनदार जयप्रकाश अमनगी, रेवणसिद्ध माळी, गौरीशंकर वाले, बसवराज ऊळागड्डे, शिवानंद भीमदे, सुभाष सरसंभी, शैलेंद्र लिंबूतोटे, रमेश वाले, संजय वाले, पुजारी निलप्पा वाले, मुरगेंद्र वस्त्रद , राजू स्वामी, सुरेश कुडल, गुरुनाथ कुदळे, इराप्पा कुदळे, अशोक मेत्रे यांच्यासह सर्व भक्तगण परिश्रम घेत आहे.

**गुढीपाडव्यानिमित्त आज पालखी मिरवणूक**

गुरुवारी संध्याकाळी सात वाजता पालखी मिरवणूक निघणार. ही मिरवणूक टेलिफोन भवन, मंगळवार पेठ पोलीस चौकी, मधला मारुती, टिळक चौक, कसबा, होटगी मठ चौक मार्गे मल्लिकार्जुन मंदिरामध्ये समारोप करण्यात येणार आहे.

# पूर्व विभाग श्री राम मंदिराच्यावतीने आजपासून श्री राम जन्मोत्सव सोहळा

- 'श्रीं'ना विविध अवताराने करण्यात येणार अलंकृत
- प्रवचन, भजन संध्या, कल्याणोत्सवम्, स्थोत्सवम्

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

दाजी पेठेतील पूर्व विभाग श्री राम मंदिराच्या वतीने गुरुवार, दि. १९ मार्च २०२६ ते शुक्रवार, दि.२७ मार्च २०२६ या कालावधीत श्री राम जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

रामनवमीच्या दिवशी म्हणजे गुरुवार, दि.२६ मार्च २०२६ रोजी प्रभु श्री राम जन्मोत्सवसह कल्याणोत्सव, रथोत्सव हे विशेष कार्यक्रम होणार आहेत, अशी माहिती मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीनिवास सामलेटी व प्रसिध्दी प्रमुख श्रीनिवास



बिनगुंडी यांनी दिली. 'श्री'स मत्रय, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, श्री राम, कृष्ण, सुध्द, कल्की अशा अवताराने अलंकृत करण्यात येणार आहे. दररोज सकाळी ५ वाजता सुप्रभातम्, सकाळी ६ वाजता अष्टोत्तरशतनामीचना, सकाळी ७.३० वाजता अजनेयलु दुस्सा यांच्या नेतृत्वाखाली पारायण, सकाळी ९ वाजता वैदिक याग, दुपारी ४ वाजता विष्णू सहस्वनाम व कुंकुमार्चना, सायंकाळी ६ वाजता प्रवच्चन, सायंकाळी ७.३० वाजता पालखी सेवा, रात्री ८ वाजता भजन संध्या, उत्सव काळात 'श्री'स अभिषेक, दोलोत्सर, होमहवन आदी कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. राकेश अन्नम, शिवानंद जाधव, अच्युत मोफरे, अभिमन्यू डोंगरे, चंदाबाई ताकभाते, सुधाकर इंगळे यांचे प्रवचन होणार आहे. महेश गोली, रघुनाथ गहुम, श्रीनिअंबा नृत्यालय यांचे भरत नाट्यम् तर इस्कॉन, ओंकार, स्वराली या भजनी मंडळांचे भजा संध्या कार्यक्रम होणार आहे रामनवमीनिमित्त गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ रोजी बालभोग, विष्णू पंचायतन पूजा, जन्मोत्सवम्, नक्षत्रारती, ओटीभरण, हरिद्रालेपनम्, प्रलानम, सीता-राम कल्याणोत्सवम्, रथोत्सवम्, राजोपचार पूजा असे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, २ एप्रिल २०२६ रोजी हनुमान जयंती उत्सव आणि शुक्रवार, ३ एप्रिल २०२६ रोजी शतघटोभिषेकम् व सीतामाई ओटीभरणाचा महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# २३ मार्चपासून ९६ तासात घरपोच गॅस सिलेंडर द्या



## जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचे आदेश; अडचण आल्यास ९७६९९१९२२१ या क्रमांकावर तक्रार करा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

मुस्लिम धर्मियांचा रमजान ईद हा सण २१ मार्च रोजी साजरा होत आहे. त्यानंतर २३ मार्च २०२६ पासून जिल्ह्यातील सर्व गॅस एजन्सीनी गॅस वितरणात एकसूत्रता राखण्याकरता गोदाम, गॅस एजन्सी व इतर ठिकाणाहून गॅस सिलेंडरचे वितरण करू नये. जिल्ह्यात सर्वत्र घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरचा पुरवठा ऑनलाईन बुकिंग झाल्यानंतर ओटीपीद्वारे ९६ तासांत घरपोच करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले. दरम्यान, यापुढे एकाही गॅस एजन्सीसमोर लाईन चालणार नाही, असाही इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी दिला.

जिल्ह्यातील गॅस वितरणा संदर्भातील कार्यवाहीच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या सभागृहात आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, एलपीजी गॅस पुरवठा करणारे जिल्हा समन्वयक अधिकारी भुकय्या रघुकुमार यांच्यासह सोलापूर शहर व जिल्ह्यातील गॅस एजन्सीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्ह्यात एलपीजीचा पुरवठा मागणीप्रमाणे होत आहे. तरी संबंधित कंपन्यांनी त्याबाबतचा दैनंदिन अहवाल प्रशासनाला सादर करावा. कंपनीच्या स्तरावर गॅस विक्रेत्यांसाठी ज्या सूचना असतील त्या लेखी स्वरूपात गॅस विक्रेत्यांना द्याव्यात. दुसरे गॅस सिलेंडर वाटप शहरी भागात २५ दिवस तर ग्रामीण भागात ४५ दिवस आहे त्या नियमावलीचे काटेकोरपणे पालन करावे. गॅस एजन्सीने कोणताही अवैध व्यापार होणार नाही याकरिता आपल्या कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवावे. जर कुठेही असे होत असेल तर त्याबाबतची माहिती तत्काळ प्रशासनाला द्यावी. संवेदनशील गॅस एजन्सीची माहिती पुरवठा विभागाला द्यावी. त्याप्रमाणे त्या एजन्सीला पोलीस संरक्षण देण्याबाबत पोलीस विभागाला कळविण्यात येईल. तसेच पोलीस विभागाने रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर गॅस एजन्सी समोर खरेदी होऊ नये याकरिता शहरी व ग्रामीण भागात पेट्रोलिंग करावे असेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले. एलपीजी गॅस पुरवठा करणाऱ्या कंपन्याचे जिल्हा समन्वयक अधिकारी रघुकुमार यांनी गॅस पुरवठ्याच्या अनुषंगाने एचपीसीएल, बीपीसीएल व आयओसीएल यांच्याकडून एजन्सीसाठी आलेल्या सूचना दिलेल्या आहेत. जिल्ह्यात मागणीप्रमाणे एलपीजी गॅस पुरवठा मिळत असल्याचे सांगून २३ मार्च २०२६ पासून ऑनलाईन बुकिंग केल्यानंतर ओटीपी द्वारे ९६ तासात गॅस सिलेंडर एजन्सी उपलब्ध करून देतील, असे त्यांनी सांगितले. प्रारंभी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी ग्रामीण भागातील गॅस पुरवठ्याच्या अनुषंगाने माहिती दिली तर अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी सोलापूर शहरात एलपीजी गॅस पुरवठ्याच्या अनुषंगाने माहिती दिली.

## महत्वाचे...



### बाजारपेठेतील अनिष्ट प्रथांविरुद्ध जागरूक ग्राहक बना : तहसीलदार शेख

**बार्शी, दि. १८ मार्च-**

ग्राहकांनी आपल्या हक्कांसाठी जागरुक राहण्याचे आणि बाजारपेठेतील अनिष्ट प्रथांविरुद्ध सजग राहावे. सध्याच्या आखाती युद्धाच्या जागतिक परिस्थितीमुळे गॅस व इंधन टंचाई बाबतच्या अफवांमुळे निर्माण झालेल्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर काहीजण ग्राहकांची फसवणूक करण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी तहसील प्रशासन व ग्राहक पंचायत संयुक्तपणे कार्य करणार असल्याचे मत तहसीलदार एफ.आर. शेख यांनी व्यक्त केले. जागतिक ग्राहक दिनाचे औचित्य साधत तहसील कार्यालय बार्शी व अखिल भारतीय ग्राहक पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने व्यापारी व व्यावसायिकांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत ग्राहक हक्क, बाजारपेठेतील पारदर्शकता आणि ग्राहक फसवणूक रोखण्यावर भर देत विशेष चर्चा करण्यात आली. यावेळी माहिती अधिकार जेष्ठ कार्यकर्ते दीनानाथ काटकर यांनी ग्राहक फसवणुकीचे विविध प्रकार स्पष्ट करताना, ग्राहकांनी व्यवहार करताना सतर्क राहण्याची गरज अधोरेखित केली. यावेळी तहसीलदार संजीवन मुंडे, नायब तहसीलदार रविंद्र सानप, पुरवठा अधिकारी निलेश आठवले, ॲड. विजय कुलकर्णी उपस्थित होते.



### उत्तरेश्वर भोसले यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**करकंब, दि.१८ मार्च.**

विद्या विकास मंदिर उंबरे (पागे) येथील इंग्रजी शिक्षक उत्तरेश्वर बळीराम भोसले यांना सोलापूर जिल्हा इंग्लिश टीचर्स असोसिएशन व यशकल्याणी सेवाभावी संस्था करमाळा यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी श्री.स्वामी समर्थ मंदिर अक्कलकोटचे विश्वस्त, चेअरमन महेश महाराज इंगळे, यशकल्याणी सेवाभावी संस्था करमाळा अध्यक्ष गणेश करे-पाटील, डॉ. प्रचिती पुंडे,असोसिएशन अध्यक्ष बाळकृष्ण लावंड, उपाध्यक्ष आगतराव भोसले, पंढरपूर ता.अध्यक्ष शिवाजीराव दांडगे, खजिनदार बाबुराव काकडे, सदस्य शिवाजीराव कदम, शिक्षक सचिन हेंबाडे, पांडुरंग गायकवाड, विद्या विकास मंदिर उंबरेचे (पागे) सहकारी शिक्षक मित्र रघुनाथ ढोबळे, आण्णा लोखंडे, समीर जाधव, विष्णू दगडे, कृष्णा खुळपे उपस्थित होते.



### राजर्षी शाहू कॉलेजमध्ये महिला दिन साजरा

**बार्शी, दि. १८ मार्च-**

राजर्षी शाहू लॉ कॉलेज व जिजाऊ सावित्री रमाई महिला बळविकास समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिन यशवंतराव चव्हाण सभागृह येथे पार पडला. कार्यक्रमासाठी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी यांच्या सर्व शाखेमधील २२५ महिलांनी सहभाग नोंदवला. छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे, छत्रपती शाहू महाराज, जिजाऊ, सावित्री व रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली, सौम्या सोपल यांनी स्वागत गीत सादर केले. पाहुण्यांचे स्वागत व परिचय डॉ. स्मिता सुरवसे डॉ. लाजवंती राठोड यांनी केले. प्रास्ताविक डॉ. ज्योती माळी यांनी केले. मंचावर संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी.वाय. यादव, प्रमुख पाहुणे म्हणून जनरल सेक्रेटरी प्रकाश पाटील, खजिनदार जयकुमार शितोळे, प्राचार्य चंद्रकांत मोरे, राजर्षी शाहू लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. रत्नदीप सोनकांबळे उपस्थित होते, समितीच्यावतीने देण्यात येणारा शौर्य पुरस्कार कुमारी संगीता चौधरी यांना देण्यात आला, उत्कृष्ट शाखांना समितीच्यावतीने पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. विविध शाखेमधील गरजवंत व गुणवंत विद्यार्थी यांना रोख स्वरुपात रक्कम देऊन सहकार्य केले. भाऊबीज निधी वाटप केला, लक्ष्मीबाई जगदाळे यांच्या फोटोंचे वाटप संस्थेतील सर्व शाखांना महिला बळविकास समिती यांच्यामार्फत करण्यात आले व सर्व समंतीने नवीन समिती पदाधिकारी निवड करण्यात आली. अध्यक्ष- डॉ. स्मिता सुरवसे, उपाध्यक्ष- प्रा.मंजुषा श्रीमंगल, कार्याध्यक्ष- प्रा. संगीता गायकवाड, सचिव- ग्रंथपाल ज्योती यादव, सहसचिव- डॉ. ज्योती माळी, खजिनदार- डॉ. लाजवंती राठोड. निवड प्रक्रिया जिजाऊ सावित्री रमाई बळविकास समितीची निवड सर्व मान्यवर व महिला सदस्य यांच्या माध्यमातून करण्यात आली. सूत्रसंचालन प्राध्य्दीपिका साखरे व कार्यक्रमाचे आभार प्रा. शिकारे यांनी केले, कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी डॉ. दत्तप्रसाद सोनटक्के, प्रा. मिठ्ठा, प्रा. सुरवसे, प्रा. कुलकर्णी, प्रा. हरदाडे, प्रा. काळे, प्रा. खोत, प्रा. शेख, प्रा. वडणे, प्रा. तायडे, गव्हाणे, वाघे, माने, ठोंबरे, शेळके, कोल्हे व सातपुते यांनी परिश्रम घेतले.

### मार्केट यार्ड परिसरात चारचाकीने दिली धडक

**सोलापूर, दि. १८ मार्च-**

मार्केट यार्ड मार्गे सागर चौक सोलापूर या ठिकाणावरून दि. १४ मार्च रोजी गंगाधर सिद्राम बत्तुल वय ४९, रा. ४३/४४ कोटा नगर, जुना विडी घरकुल, सोलापूर यांची मुलगी ही गाडीवर जात असताना हैदराबाद रोडने सोलापूर कडे येणाऱ्या अनिल पोरवाल रा. भवानी पेठ, सोलापूर यांच्या ताब्यातील चार चाकी गाडी क्रमांक एम हेच १३ इसी ६९०१ या गाडीने गंगाधर बत्तुल यांच्या मुलीच्या गाडीला धडक दिली. त्यात तिला दुखापत झाली असून गाडीचे नुकसान ही झाले आहे. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात दि. १७ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास डोके करत आहेत.

## जाधववस्ती येथे हनुमान जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज, दि.१८ मार्च-**

मोहोळ तालुक्यातील वाळूज येथील जाधववस्ती येथे श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ रोजी सप्ताहास प्रारंभ होणार असून गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६ रोजी सप्ताहाची सांगता होणार आहे.

या निमित्ताने जाधववस्ती येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २६ मार्च रोजी सकाळी ७ वाजता दिंडी, श्रींचा अभिषेक, कलशपूजन व देवतापूजनाने सप्ताहाची सुरुवात होणार आहे. सप्ताहादरम्यान दररोज पहाटे ४ ते ६ काकडा, सकाळी ६ वाजता श्रींची पूजा, सकाळी ७ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ११ ते दुपारी १ गाथा भजन, दुपारी ३ ते ४ हनुमान चालीसा पठण, सायंकाळी ५ वाजता हरिपाठ, सायंकाळी ६ ते ७ प्रवचन, रात्री ८ ते १० हरिकीर्तन तसेच त्यानंतर पंचक्रोशीतील भजन मंडळांचा जागर असे विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.



या सप्ताहात हभप नागनाथ धुमाळ (वाळूज), हभप भगवान कुलकर्णी (वाळूज), हभप रवींद्र आठवले (दादपूर), हभप परमेश्वर शिंदे (देगाव), हभप गुरुराज कुलकर्णी (वाळूज), हभप. माधव मोटे (वाळूज) व हभप नवनाथ मोटे यांची प्रवचन सेवा लाभणार आहे. तसेच हभप पंडित महाराज मदने (पुळुजवाडी), हभप श्रीगुरु विठ्ठल महाराज नामदास, ह.भ.प. अनंत महाराज कणिरे, ह.भ.प. नवनाथ महाराज मोटे (वाळूज), ह.भ.प. विठ्ठल चवरे महाराज (पंढरपूर), ह.भ.प. श्रीगुरु ज्ञानेश्वर महाराज कदम (छोटे माऊली, आळंदी) व ह.भ.प. माऊली गुरव महाराज (उंदरगाव) यांचे हरिकीर्तन होणार आहे. दि. २ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ७ ते ९ या वेळेत हनुमान जन्मोत्सवानिमित्त ग्रामप्रदक्षिणा दिंडी काढण्यात येणार असून त्यानंतर हभप श्रीगुरु माधव महाराज राशीनकर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाने सोहळ्याची सांगता होणार आहे.

## अक्कलकोट परिसरात मंगळवारी रात्री गारपीट, पावसाने झोडपले

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि . १८ मार्च**

अक्कलकोट शहर व परिसरात मंगळवारी रात्री वीजेच्या कडकडाट व लखलखाट व मेघ गर्जनेसह अवकाळी मोठा पाऊस व मोठी गारपीट झाली. गारा हरभऱ्याच्या बोंडापेक्षा मोठ्या होत्या. गारपीटीमुळे काढणीस आलेले ज्वारी, गहू, हरभरा, द्राक्षे, पपई, टरबुज, कलिंगड, टमाटे, वांगी, भाजी आदि पिकाना अधिक स्वरूपात फटका बसला आहे. शेतकऱ्याना रब्बी पिक प्रतवारीमध्ये मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. खरीप पिकाचे झालेले नुकसान आता रब्बी पिकाला ही पावसाने गारपीट मुळे मोठा फटका बसल्याने बळी राजाचे कंबरडेच मोडले आहे. शेतकरी या संकटातुन सावरणे कठीण वाटत आहे.

मंगळवारी रात्री हलक्या सरी झाल्या. यानंतर गारा पडण्यास प्रारंभ झाला. अर्धा तास गारा पाऊस झाला. अर्धा तास विश्रांती नंतर रात्री साडे आठ नंतर पुन्हा वीजे चा कडकडाट लखलखाट मेघ गर्जना व गाराच्या पावसाला प्रारंभ झाला या गारा मोठया होत्या पत्र्यावर दगड पडल्या सारखा आवाज होत होता शहरात सखल भागात खड्डयामध्ये पावसाचे पाणी थांबले होते. हवेत गारवा निर्माण झाला होता रात्रभर कमी अधिक स्वरूपात गारपीट पाऊस ढगाचा गडगडाट विजेचा कडकडाट चालुच होता या अवेळी पाऊस व गारपीट मुळे रब्बी पिकाचे फळ बागांचे मोठे नुकसान झाल्याची शक्यला शेतकरी वर्गानी व्यक्त केली आहे. अक्कलकोट शहर व तालुक्यात बोरी उमरगे रामपुर इटगे, ममदाबाद, हसापुर, बॅगेळी, सांगवी, निमगाव, कंठेळी, मातनाळी, नागनाळी, काळेगाव, मिरजगी, उडगी, दहिटणे, बादेले, चप्पळगाव आदी तालुक्यातील भागात हा पाऊस गारपीट झाल्याचे वृत्त आहे.

## पोल्ट्री व चिकन सेंटर बंद करण्याची मागणी

### दुर्गंधीमुळे रोगराई पसरण्याची भीती

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १८ मार्च-**

मंद्रूप येथील लोकसेवा शाळेसमोर निर्मला चव्हाण हाऊसिंग सोसायटी येथे रहिवासी जागेवर अवैद्य पोल्ट्री व्यवसाय व चिकन सेंटर सुरू केल्याने नागरिकांना दुर्गंधीचा त्रास होत आहे. यामुळे रोगराई पसरण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे येथील चिकन सेंटर बंद करण्याची मागणी येथील नागरिकांनी केली आहे.

मंद्रूप येथील लोकसेवा शाळेसमोर असणाऱ्या निर्मला चव्हाण हाऊसिंग सोसायटी मध्ये नागरिकांची वर्दळ असणाऱ्या मध्यवर्ती ठिकाणी चिकन सेंटर सुरु करण्यासाठी मंद्रूप ग्रामपंचायतकडून ना हरकत दाखला देण्यात आला आहे. यामुळे शाळेतील विद्यार्थी व अबालवृध्दांना त्रास होत आहे. रस्त्यावर पडलेल्या चिकन मांसमुळे कुत्र्यांची वर्दळ वाढले असून अपघातही होत आहेत . शिवाय या परिसरात लिंगायत ,जैन, कासार ,ब्राह्मण यासह इतर शाकाहारी लोकांचे प्रमाण अधिक असून या चिकन सेंटरमुळे परिसरातील नागरिकांना त्रास होत आहे. त्यामुळे वरिष्ठांनी मंद्रूप ग्रामपंचायतवर कारवाई करून येथील चिकन सेंटर बंद करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

**या जागेचा खटला न्यायालयात सुरू असताना मंद्रूप ग्रामपंचायतीकडून नियमबाह्य**

चिकन सेंटर सुरू करण्यासाठी ना हरकत दिल्यामुळे नागरीकांना त्रास होत आहे. या मागणीचे निवेदन वरीष्ठ अधिकार्यांना दिले असून चिकन सेंटर बंद न केल्यास मंद्रूप ग्रामपंचायत समोर आंदोलन करण्यात येणार आहे. या चिकन सेंटरमुळे दुर्गंधीचा त्रास होत असून कुत्र्यांचा वावर वाढला आहे त्यामुळे दुचाकी अपघातांच्या प्रमाणामध्ये वाढ झाली असून प्रशासनाने तात्काळ कारवाई करून चिकन सेंटर बंद करावे अन्यथा ग्रामपंचायत कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार आहे.

**प्रदीप ख्याडे,** रहीवाशी, मंद्रूप

## मोटरकारमध्ये बेकायदेशीर जर्सी गाईची वाहतूक

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १८ मार्च-**

मोटर कारणे जात असताना दि. १७ मार्च रोजी विष्णू कुमार शिवराम नायर वय ४०, रा. घर नंबर २०१, बिल्डिंग नंबर ३, एनटीपीसी टाऊनशिप, सोलापूर यांचा मित्र चंदन राजन, त्याची पत्नी व मुलगी असे सोलापूर रेल्वे स्टेशन येथे एमएच ४० इ ८१३२ ही महावीर चौक सोलापूर येथे आली असता एक टाटा ग्रंडी मोटर कारचा अनोळखी चालक याने त्याच्या ताब्यातील कार भरधाववेगाने, निष्काळजीपणे चालवून अपघात झाला आहे.

विष्णूकुमार नायर यांच्या कारचे नुकसान झाले. त्या मोटर कारमध्ये जर्सी गाईची बेकायदेशीर वाहतूक करताना आढळून आली आहे. याबाबत सदर बाझार पोलीस ठाण्यात दि. १७ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस अधिकारी राजगुरू करत आहेत.



## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते नूतन सभापती पूनम इंगवले यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १८ मार्च-**

सांगोल्यात पंचायत समिती मध्ये प्रथमच भाजपचा सभापती झाल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई येथे नूतन सभापती पूनम इंगवले यांचा विशेष सत्कार केला. यावेळी सांगोल्यात ऑपरेशन लोटस यशस्वी करणारे ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, माजी आ. दिपकआबा साळुंखे पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत, बाळासाहेब एरंडे, प्रशांत वलेकर, सुदर्शन इंगवले उपस्थित होते.

सांगोला पंचायत समितीच्या राजकीय इतिहासात अपवादात्मक परिस्थिती सोडली तर अनेक वर्ष शेकापची एक हाती सत्ता होती. मात्र यंदा प्रथमच सांगोला तालुक्यात ऑपरेशन लोटस राबवत माजी आ. शहाजीबापू पाटील आणि दिपकआबा साळुंखे-पाटील या दोन मित्रांना एकत्रित आणत पंचायत समितीवर महायुतीचा झेंडा फडकवला.

**सांगोलकरांना मिळणार रिटर्न गिफ्ट**

सांगोला पंचायत समितीच्या इतिहासात प्रथमच भाजपचा सभापती झाल्याने ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगोलकरांना मोठे रिटर्न गिफ्ट देण्याची घोषणा यावेळी केली. सांगोला पंचायत समितीसाठी लवकरच सुसज्ज अशी प्रशासकीय इमारत उभी करण्याचा शब्द त्यांनी दिला. लवकरच या इमारतीचे भूमिपूजन होईल असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## ८५ देशी गोवंशांना कत्तलीपासून वाचवण्यात यश

### श्रीराम सेना व प्राणिन फाउंडेशन यांच्या प्रयत्नांना यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला बाजारातून मोठ्या प्रमाणात देशी गाईंची कत्तलीच्या उद्देशाने कर्नाटकच्या दिशेने मोठ्या प्रमाणात तस्करी होते. अशी खात्रीलायक गोपनीय माहिती माहिती सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक व उपअधीक्षक यांना श्रीराम सेना व प्राणिन फाउंडेशन सोलापूर यांच्यामार्फत देण्यात आली होती.

तसेच गोरक्षकांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार रमजानच्या पार्श्वभूमीवर कर्नाटकच्या दिशेने देशी गोवंशाची कत्तलीच्या उद्देशाने मध्यरात्री वाहतूक करण्यासाठी सांगोला येथील काही भागात गुप्त ठिकाणाहून तस्करी होणार असल्याची खात्रीलायक बातमी मिळाली तत्काळ आम्ही श्रीराम सेना व प्राणी फाउंडेशनच्या गोरक्षकांनी



कार्य तत्परता दाखवीत सोलापूर ग्रामीण पोलीस उपाधीक्षक श्री प्रीतमजी यावलकर सर यांच्या मदतीने व तसेच मंगळवेढा उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे साहेब यांच्या मदतीने मध्यरात्री १२ वाजताच्या दरम्यान सांगोला कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत भरविल्या जाणाऱ्या गुरांच्या आठवडी बाजारास लागून असलेल्या भीम नगर जवळील चिलारी या भागात गोरक्षकांनी दिलेल्या गुप्त माहितीप्रमाणे पोलिसांनी सांगोला कृषी उत्पन्न बाजार समितीस लागून असलेल्या चिलारी या भागात मध्यरात्री छापा टाकला असता त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात खिलार जातीय देशी गोवंश हे अंधारात,काटेरी झाडीझुडपात त्यांना कुठल्याही प्रकारची चारा पाण्याची व्यवस्था न करता त्रास होईल अशा पद्धतीने दोरखंडाने बांधलेले होते तसेच सदर खिलार जातीय देशी गोवंशांची मध्यरात्रीत कर्नाटकच्या दिशेने कत्तलीच्या उद्देशाने होणारी तस्करी रोखण्यात पोलीस प्रशासनाला व गोरक्षकांना एक उत्तुंग यश मिळाले व सदरील घटनास्थळावर मिळून आलेल्या ८५ देशी गोवंशाला कत्तलीपासून वाचविण्यात आले. एकंदरीत जीवदानच दिल्यासारखे झाले. असे मत घटनास्थळावर उपस्थित गोरक्षकांनी व पोलिसांनी व्यक्त केले. सदर गोवंशाचे पुढील चारा पाण्याच्या देखभालीसाठी / संगोपनासाठी जुना कारंबा नाका येथील अहिंसा गोशाळा येथे सुखरुपरीत्या सोडण्यात आले. सदर कारवाईमध्ये ४१ खिलार गायी, ८ खिलार कालवडी, २० खिलार खोंडे, ३ गीर गायी, २ गीर गायीची कालवडी, ७ गीर गाईंची खोंडे व ४ जर्शी गायी अशी ७ लाख ६३ हजार रुपयाची ८५ जनावरे मिळून आली आहेत. सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, मंगळवेढा उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे यांचे मार्गदर्शनाखाली सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे, सपोनि वाघे, पोसई. पुजारी, पाटील, नपोसई उबाळे, मपोसई चव्हाण, ग्रे. पोसई. बगाडे, कदम, पोहेकॉ. कोष्टी, वाघमोडे, क्षीरसागर, जाधव, पोना. लेंगरे, वाकीटोळ, पोकॉ. डोबळे, पाटील, वाघमोडे, राऊत, दरदरे, कुंभार तसेच मंगळेवढा पोलीस ठाणेकडील सपोनि. लातुरकर, पोकॉ. सुतार, केरनर, जोजारे, पोहेकॉ. यादव व पंढरपुर शहर पोलीस ठाणेकडील पोसई. जगताप, पोहेकॉ. बिचुकले, बडे, लोखंडे, सर्जे, मदने, पोना. पकाले यांनी केली. सदर कारवाई हे श्रीराम सेना सोलापूर व प्राणीन फाउंडेशन सोलापूर यांच्या गोरक्षकांमार्फत यशस्वीरित्या पार पाडण्यात आली.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## रोटरी क्लबतर्फे घोडा तांडा जि. प. शाळेत पाण्याच्या टाकीचे वितरण



**सोलापूर, दि. १८ मार्च-**

आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळा घोडा तांडा येथे रोटरी क्लब ऑफ सोलापूर तर्फे माजी अध्यक्ष कै. रो. व्यंकटेश नुले यांच्या स्म रणार्थ १००० लिटर पाण्याच्या टाकीचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात शाळेतील विद्यार्थ्यांच्या स्वागत गीताने झाली. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन रोटरी क्लबच्या अध्यक्षा धनश्री केळकर यांनी केले.

रोटरी क्लबचे प्रकल्प प्रमुख प्रशांत नुले आणि विशाल वर्मा यांच्या उपस्थितीत मुख्याध्यापक संजय गायकवाड यांना पाण्याच्या टाकीचे हस्तांतरण करण्यात आले. गणपती कुडले व सुजाता खेडगीकर यांनी प्रास्ताविक केले. २०० मीटर धावण्यात प्रथम येणारी प्रीती पंडित राठोड व राज्यस्तरीय खेळाडू यांचे पुष्प देऊन मालन राठोड यांचे पुष्प देऊन कौतुक केले. सूत्रसंचालन गणपती कुडले यांनी केले.

## महत्त्वाचे



### गौडगाव येथे लोकप्रतिष्ठा विचार मंचच्यावतीने इफ्तार पार्टी

**बार्शी, दि. १८ मार्च-**

तालुक्यातील गौडगाव येथे इफ्तार पार्टीचे आयोजित करण्यात आले होते. इफ्तार पार्टी ही केवळ उपवास सोडण्याची धार्मिक परंपरा नव्हे, तर समाजातील एकात्मतेचा सुंदर संदेश देणारा सोहळा ठरला. या कार्यक्रमाला गौडगाव येथील लोकप्रतिष्ठा विचार मंच अध्यक्ष राहुल भड तसेच हिंदू समाजातील अनेक बांधव उपस्थित राहिले होते. सर्वजण एकत्र बसून साधेपणाने इफ्तार करताना धर्म, जात, पंथ या सगळ्या भेदांना बाजूला ठेवून एकत्र येण्यातच खरा आनंद आहे' हेच जणू प्रत्यक्षात अनुभवायला मिळाले. याप्रसंगी उपस्थितांनी परस्परांशी संवाद साधत आपुलकी वाढवली आणि सामाजिक सौहार्दाचा आदर्श निर्माण केला. यावेळी पंचायत समितीचे सदस्य संजय भड, कुमार पाटील, पांडुरंग पाटील, सतीष भड, युवराज काजळे, बालाजी भड, सुशांत सुरवसे, विनोद सोनवणे, जयवंत सुरवसे, आदेश यादव, सुरेश आरगडे उपस्थित होते



### महिला दक्षता कमिटीचे कार्य समाजासाठी मोलाचे : आशिष कांबळे

**वेळापूर, दि. १८ मार्च-**

महिला दक्षता कमिटीतील सदस्य महिला या पोलीस प्रशासनासाठी अत्यंत महत्त्वाची कडी आहेत. वेळापूर पोलीस स्टेशनमध्ये महिलांविषयी दाखल होणाऱ्या प्रकरणांमध्ये पीडित महिलांना समुपदेशन करण्यासाठी या महिला नेहमी तत्परतेने उपस्थित राहतात. समाजात सुरक्षित आणि सशक्त वातावरण निर्माण करण्यासाठी महिला दक्षता कमिटीचे कार्य मोलाचे आहे, असे प्रभारी अधिकारी आशिष कांबळे यांनी सांगीतले. वेळापूर पोलीस स्टेशन येथे महिला दक्षता कमिटीची बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीला जि.प. सदस्या मिनाक्षी सरतापे, माजी पं.स. सदस्या रेणुका माने-देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्ष महिला सोलापूर जिल्हा उपाध्यक्षा अश्विनी भानवसे, ग्रामपंचायत सदस्या सीमा खाडे, निलम बनसोडे, डॉ. देशपांडे, पूनम शिंदे, महिला पोलीस कर्मचारी प्रियांका सुर्यवंशी आदी मान्यवर महिला उपस्थित होत्या. यावेळी जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर उपस्थित सर्व महिलांचा वेळापूर पोलीस स्टेशनच्या वतीने सन्मान करण्यात आला.





### आदर्श पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनींचे नवोदय परीक्षेत यश

**कुर्डूवाडी, दि. १८ मार्च-**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत आदर्श पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनींनी यश संपादन केले आहे. या परीक्षेत आरोही सोमनाथ कांबळे व आरोही संजय कांबळे या दोन विद्यार्थिनींची नवोदय विद्यालयासाठी निवड झाली. विद्यार्थिनींना पूनम बारबोले, बालिका कोरके, अनिता थोरात व सुरेखा कांबळे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थिनींचे संस्थेचे संस्थापक अमोल सुरवसे, प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे, मुख्याध्यापक आयेशा मुलाणी यांनी अभिनंदन केले.

### मेकअपसाठी घरी आलेल्या महिलेवर चोरीचा आरोप

**बार्शी, दि. १८ मार्च-**

मुलींच्या मेकअप लग्नसमारंभासाठी करण्यासाठी घरी आलेल्या ओळखीच्या महिलेवर सोन्याचे गंठण चोरी केल्याचा आरोप करत बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. याबाबत अर्चना श्रीराम सांगळे (वय ३८, रा. भिसे प्लॉट, आगळगाव रोड, बार्शी) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, १५ मार्च रोजी नातेवाईकांच्या लग्नानिमित्त त्यांच्या दोन्ही मुली ऋतुजा व पूजा या बार्शी येथे आल्या होत्या. १४ मार्च रोजी मुलगी ऋतुजाने तुटलेले १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण (किंमत अंदाजे ५२ हजार रुपये) आईकडे ठेवण्यासाठी दिले होते. ते सांगळे यांनी घरातील कपाटातील डबीत ठेवले होते. १५ मार्च रोजी सकाळी १० वाजता मुलींचा मेकअप करण्यासाठी ओळखीच्या सुप्रिया जगदीश मगर-कवडे (रा. बारंगुळे गल्ली, कसबा पेठ, बार्शी) या घरी आल्या. त्यांनी सुमारे ११.३० वाजेपर्यंत मेकअप करुन घरातून निघून गेल्या. त्यानंतर काही वेळाने मुलगी कपाटातून गंठण घेण्यासाठी गेली असता डबीत ठेवलेले गंठण गायब असल्याचे लक्षात आले. घरात सर्वत्र शोध घेतल्यानंतरही गंठण मिळून न आल्याने पोलिसांना कळविण्यात आले. पोलिसांनीही तपास करत सुप्रिया मगर यांना पोलीस ठाण्यात बोलावून अंगझडती घेतली; मात्र त्यांच्याकडे गंठण आढळून आले नाही. तरीही संशय व्यक्त करत सांगळे यांनी त्यांच्याविरोधात चोरीची तक्रार दिली आहे. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## पेढा व्यापाऱ्यांवर आर्थिक संकट

### एक हजार कामगारांवर उपासमाराची वेळ

#### गॅस अभावी उत्पादन बंद करण्याची वेळ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१८ मार्च -**

श्री विठ्ठलाच्या दर्शनाला आलेले भाविक विठ्ठलाचा प्रसाद म्हणून खास येथील खव्याचे पेढे खरेदी करतात. यामुळे पंढरपुरात पेढ्याला मोठ्या प्रमाणात मागणी आहे.सध्या गॅसची टंचाई भासत असल्यामुळे याचा परिणाम पेढे तयार करण्यावर झाला असून गॅस मिळत नसल्यामुळे येथील पेढे उत्पादक व्यापाऱ्यावर आर्थिक संकट कोसळले आहे. जर अशीच परिस्थिती राहिली तर पेढा तयार करणाऱ्या कारखान्यामधील सुमारे पाचशे ते हजार काम गारांवर उपासमारीची वेळ येणार आहे.



पंढरपूर हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनाला दररोज सुमारे ५० ते ६० हजारांहून अधिक येथे येत भाविक येतात. आलेले भाविक विठ्ठलाचा प्रसाद म्हणून पेढे खरेदी करतात. यामुळे येथील पेढ्यांना चांगली गागणी असल्यामुळे पंढरपुरात पेढे तयार करण्याचे सुमारे ५० ते ६० कारखाने आहेत. या कारखान्यामध्ये पेढे तयार करण्यासाठी व्यावसायिक गॅसचा वापर करण्यात येतो. मात्र सध्या व्यावसायिक गॅस सिलेंडर देणे बंद करण्यात आले आहे. यामुळे पेढे कारखान्यात पेढे तयार करण्यास अडचण निर्माण होणार आहे. यामुळे व्यापाऱ्यांवर आर्थिक संकट कोसळणार असून या कारखान्यात काम करणाऱ्या सुमारे १००० कामगारावर उपासमारीची वेळ येणार आहे. म्हणून पेढे तयार करणाऱ्या कारखान्यास शासनाने गॅस पुरवठा करावा, अशी मागणी पेढे उत्पादक व्यापारी किंवा कारखानदारांकडून करण्यात आली आहे.

## शेतकरी संकटात, हमीभाव फक्त कागदावरच

### खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी लोकसभेत मांडले वास्तव

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १८ मार्च-**

आज अर्थसंकल्पीय अधिवेशनात लोकसभेत कृषी विभागाच्या मागण्यांवर बोलताना खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी शेतकऱ्यांची वास्तव परिस्थिती मांडली.



देशातील ५० टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या शेतीवर अवलंबून असताना देशातील शेतकरी आज गंभीर संकटात आहे. उत्पादन खर्च वाढतोय, पण उत्पन्न नाही.योग्य दर न मिळाल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत चालला आहे.हमीभाव केवळ कागदावर राहिला आहे. शेतीसाठीचे सिंचन प्रकल्प अपूर्ण आहेत,त्यामुळे शेती अजूनही पावसावर अवलंबून आहे. त्यातच इराण-इस्राईल-अमेरिका युद्धामुळे केळी निर्यातीवर परिणाम होऊन केळीसह इतर फळे भाजीपाला यांचे दर कोसळले आहेत.फळपिकांच्या बाजारभावात सरकारने हस्तक्षेप करण्याबरोबरच निर्यात सुरळीत करण्यासाठी उपाययोजना करण्याची म ागणी केली.तसेच करमाळा तालुक्यात केळी संशोधन केंद्र सुरू करण्याची आग्रही मागणी केली.

## आदर्श शिक्षक पुरस्काराने प्रा.डॉ.नवनाथ शिंदे सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १८ मार्च -**



सांगोला महाविद्यालयातील हिंदी विभागप्रमख डॉ. नवनाथ सर्जेराव शिंदे यांना ग्लोबल फौंडेशन ऑफ इंडिया यांच्या वतीने राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ग्रामीण भागामध्ये उच्च शिक्षण क्षेत्रात दिलेल्या योगदानासाठी पुणे जिल्ह्यातील सुभाष बाबर कुल आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, केडगाव येथे संपन्न झालेल्या एका राष्ट्रीय चर्चासत्रात हा पुरस्कार त्यांना देण्यात आला. प्र. प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांनी व विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## नववर्ष, गुढीपाडवानिमित्त अकलूजमध्ये बाजारात गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १८ मार्च-**

मराठी नववर्षाच्या निमित्ताने आज अकलूज बाजारपेठेमध्ये साखरेचे हार फुलांचे हार घेण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली गुढी उभारण्यासाठी लागणारे साहित्य बाजारात विक्रीस आले होते साखरगाठी हाराला आणि खोबरे खारीकराला यावेळेस महत्त्व असते प्रत्येक घरी साखरेचा हार घेऊन जातात पूर्वी साखरेचे हार घरोघरी वाटण्याची पद्धत होती आता ती मोडकळीस आली आहे अकलूज मध्ये साखरगाठी हार तयार करण्याचे चार-कारखाने होते मात्र आता सर्व कारखाने मजुरा भावी बंद असून बाहेरून पंढरपूर नातेपुते करमाळा आदी भागातून हारगाठी व्यापारी आणून विकत आहेत साधारण ८० ते शंभर रुपये किलो हार गाठी विकली जात आहे खोबरे वाटी व खारीक यांचे हार पाहायला सुद्धा मिळाले नाहीत अकलूज हे पंचक्रोशीतील मोठे गाव आहे परंतु आता खेडोपाडी मोठी मोठी दुकाने झाली आहेत तिथे हार गाठी व इतर सर्वच साहित्य मिळत असल्याने ग्राहक अकलूज कडे मोठ्या प्रमाणावर येत नाही बाजारपेठ मोठी असल्याने परिसरातील फुल विक्रेते विशेषतः पंढरपूर वरून फुल माळा विक्रीसाठी येतात ५० ते २०० रुपयापर्यंत फुलांचे हारांचे भाव होते पिवळा झेंडू मोठ्या प्रमाणा त आज विक्रीसाठी आला होता त्याचबरोबर पांढरी बिजली आणि शेवंती फुले सुद्धा बाजारात विक्रीसाठी आली होती.



गुरुलिंग तांदूळकर यांचा साठ वर्षांपासून हार गाठी बनवण्याचा कारखाना होता त्याच्यानंतर त्यांचे नातू हा व्यवसाय करू शकले नाहीत त्यांनी सांगितले. या कामासाठी मजूर मिळत नाही आणि पूर्वीसारखे साखरेच्या हार विक्री सुद्धा होत नाही जिथे गिऱ्हाईक पाच किलो दहा किलो घेऊन जात होता तेथे एक आणि अर्ध्या किलोवर ग्राहक आला आहे.

## गर्भाशय मुख कर्करोगाविषयी जागरूकता गरजेची

### डॉ. प्रतिभा बलदवा; रक्तदान, कर्करोग तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

गर्भाशय मुख कर्करोग हा महिलांमध्ये आढळणारा गंभीर आजार असून त्याकडे वेळेत लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे, या आजाराची सुरुवातीची लक्षणे अनेकदा सौम्य स्वरूपाची असल्याने महिलांकडून त्याकडे दुर्लक्ष होते. अनियमित रक्तस्राव, पोटदुखी किंवा अशक्तपणा ही काही प्रमुख लक्षणे असून त्याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. या आजारामागील प्रमुख कारणांमध्ये संसर्ग, अस्वच्छता आणि आरोग्याविषयी जागरूकतेचा अभाव यांचा समावेश होतो. मात्र, वेळेवर तपासणी आणि योग्य उपचार घेतल्यास हा आजार पूर्णपणे टाळता येऊ शकतो, असे प्रतिपादन असे मत डॉ. प्रतिभा बलदवा यांनी व्यक्त केले.



येथील एस. एस. बलदवा न्यूरोसायन्सेस अँड वूमेन्स केअर हॉस्पिटलच्या आठव्या वर्धापनदिनानिमित्त रक्तदान आणि गर्भाशयमुख कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यावेळी ते बोलत होते. हे शिबिर रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ यांच्या सहकार्याने वसंत विहार, जुना पुणे नाका परिसरातील एस. एस. बलदवा न्यूरोसायन्सेस अँड वूमेन्स केअर हॉस्पिटलमध्ये घेण्यात आले. यावेळी २४ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

यावेळी डॉ. गिरीष कुमठेकर, डॉ. वाले, डॉ. सुजाता कुलकर्णी, डॉ. उंबरदंड, डॉ. संतोष सपकाळ, राजगोपाल झंवर, संतोष भंडारी, रेखा बलदवा यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. संपत बलदवा यांनी हॉस्पिटलच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा प्रवास उलगडून सांगितला. आभार मेंदूरोगतज्ञ डॉ. सचिन बलदवा यांनी मानले.

## दत्तात्रय पाटील यांना पीएचडी पदवी प्रदान

**अकलूज, दि. १८ मार्च-**



येथील शंकरराव मोहिते म हाविद्यालयातील ग्रंथपाल दत्तात्रय शामराव पाटील यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची पीएच. डी. पदवी प्रदान झाली. प्रा. दत्तात्रय पाटील यांनी ग्रंथालय आणि माहिती शास्त्र या विद्यापीठाच्या स्कूल ऑफ सोशल सायन्स आंतरविद्याशाखेंतर्गत अँन इव्हेलेटीव्ह स्टडी ऑफ अवेअरनेस, युटिलायझेशन अँड सटीसफॅक्शन फॉर ई-रिसोर्से स ऑफ द फॅक्टरी मेंबर्स फॉर प्रोफेशनल डेव्हलपमेंट इन द कॉलेजेस ऑफ वेस्टर्न महाराष्ट्र या संशोधन विषयावर कार्य पूर्ण केले आहे. त्यांना डीजीबी दयानंद लॉ महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. प्रवीण वा. आडसकर यांचे मार्गदर्शन मिळाले. त्यांच्या या यशाबद्दल शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक मा. जयसिंह मोहिते-पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, संचालिका स्वरूपाराणी मोहिते-पाटील, संस्थेचे सचिव अभिजीत रणवरे तसेच सहसचिव हर्षवर्धन खराडे यांनी त्यांचा सत्कार केला.



## सांगोला विद्यामंदिरमध्ये पालक-शिक्षक सभा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१८ मार्च -**

सांगोला विद्यामंदिर ज्यु.कॉलेज येथे अकरावीची पालक-शिक्षक सहविचार सभा पार पडली. यावेळी व्यासपीठावर सभेचे अध्यक्ष उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, प्रा.शिवशंकर तटाळे, प्रा.इसाक मुल्ला, प्रा.दिलीप मस्के उपस्थित होते. प्रास्ताविकातून प्रा.शिवशंकर तटाळे यांनी सभेचा हेतू स्पष्ट केला. विद्यार्थ्यांचा वेळ वाया न घालवता आम्ही एप्रिल महिन्यापासूनच १२ वीचे तास सुरू करत आहोत. पालकांनी या बदलाची नोंद घेऊन आपल्या पाल्याला उन्हाळी सुट्टीत अभ्यासासाठी प्रोत्साहित करावे. ११ वीच्या परीक्षेतील जिद्द आणि १२ वीची वेळेत होणारी सुरुवातच आपल्याला यशाच्या शिखरावर नेईल असे मनोगत प्रकाश म्हमाणे यांनी व्यक्त केले. यावेळी प्रा.इसाक मुल्ला, प्रा.जालिंदर मिसाळ, प्रा.राजेंद्र कुंभार, प्रा.गणेश घेरडीकर यांनी शाखानिहाय अभ्यासक्रमा विषयी माहिती दिली. सूत्रसंचालन प्रा.आरती वेदपाठक यांनी केले. आभार प्रा.निलेश नागणे यांनी मानले.

## शेटफळच्या ग्रामसेवकांविरुद्ध तक्रार; चौकशी न झाल्यास उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**करमाळा, दि. १८ मार्च-**

शेटफळ (ता. करमाळा )येथील ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक सचिन सरडे यांच्यावर नवनाथ गुंड यांनी आर्थिक गैरव्यहवार केल्याचा आरोप केला आहे. गटविकास अधिकारी डॉ. अमित कदम यांच्याकडे याबाबत त्यांनी लेखी तक्रार केली असून ग्रामसेवक सरडे यांच्या काम ाची चौकशी करण्याची मागणी पत्राद्वारे केली आहे.

या पत्रात त्यांनी म्हटले आहे की, सरडे हे आठ वर्षांपासून शेटफळमध्ये ग्रामसेवक म्हणून कार्यकर्त आहेत. त्यांनी विकास कामाच्या नावाखाली गैरव्यहावार केला आहे. त्यांनी केलेल्या कामांची त्वरित चौकशी करावी, अन्यथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिवशी म्हणजे १४ एप्रिलला आम रण उपोषण केले जाईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.



## एकता महिला मंचकडून गरजू महिलांना रमजान किटचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १८ मार्च-**

पवित्र रमजान महिन्याचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी आणि सर्वधर्मसमभावाची जोपासना करण्यासाठी 'एकता महिला मंच' आणि बार्शीच्या नवनिर्वाचित नगरसेविका सायरा मुल्ला यांच्या सहकार्यातून आज कारी (ता. बार्शी) येथे गरजू म हिलांना खाद्यपदार्थांच्या (किराणा) किटचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ज्ञानज्योती क्रांतीज्योती सावित्रीबाई फ ुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी एकता महिला मंचच्या वतीने उपस्थित पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. बार्शी शहरात प्रथमच सामाजिक कार्यकर्त्या म्हणून ओळख निर्माण केलेल्या आणि नुकत्याच नगरसेविका पदी निवड झालेल्या सायरा मुल्ला यांचा एकता महिला मंचच्या वतीने विशेष गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला एकता महिला मंचच्या रेखा विधाते, नूरजहाँ शेख प्रमिला जाधव, प्रतिभा जगदाळे, कलीमा मुलाणी, मुस्कान मुलाणी, स्वाती व्हटकर, ताहीरा मुलाणी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक कलीमा मुलाणी यांनी केले. सूत्रसंचालन प्रतिभा जगदाळे यांनी केले. आभार प्रभाकर क्षीरसागर यांनी मानले.